# जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, चंद्रपूर

## जाहिरात

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, चंद्रपूर चे अंतर्गत लोक अभिरक्षक कार्यालय, चंद्रपूर येथे खालील पदे भरावयाचे आहेत. सदर पदावर चंद्रपूर येथील रहिवाशी असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

## पदाचे नांव व पात्रता

| अनु.क्र. | पदाचे नांव | संख्या | शैक्षणिक पात्रता (कमीत कमी) | एकत्रित वेतन (सर्व भत्ते मिळून दरमहा) |
|---|---|---|---|---|
| १ | कार्यालयीन सहाय्यक | ०३ | १. शासन मान्यता प्राप्त विद्यापिठातून पदवी किंवा त्यापेक्षा उच्च शिक्षण<br>२. शासन मान्य संस्थेतुन टंकलेखन मराठी ३० श.प्र.मि. आणि इंग्रजी ४० श.प्र.मि. किंवा त्यापेक्षा उच्च शिक्षण.<br>३. एमएससीआयटी किंवा तत्सम संगणक शासन मान्य पात्रता | २०,०००/— |
| २ | रिसेप्शनिस्ट कम डाटा एन्ट्री ऑपरेटर | ०१ | १. शासन मान्यता प्राप्त विद्यापिठातून पदवी किंवा त्यापेक्षा उच्च शिक्षण<br>२. शासन मान्य संस्थेतुन टंकलेखन मराठी ३० श.प्र.मि. आणि इंग्रजी ४० श.प्र.मि. किंवा त्यापेक्षा उच्च शिक्षण.<br>३. एमएससीआयटी किंवा तत्सम संगणक शासन मान्य पात्रता | १७,०००/— |

उमेदवाराने दिलेल्या नमुन्यात **प्रत्यक्ष दाखल करावे** किंवा नोंदणीकृत **डाक पोच पत्राद्वारे आरपीएडी** किंवा शिघ्र डाक सेवा (स्पीड पोस्ट) पोचपावतीसह कार्यालयीन कामकाजाचे दिवशी सकाळी ११.०० ते सायंकाळी ०५.३० वाजेपर्यंत जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, चंद्रपूर येथे **ज्या पदासाठी अर्ज करावयाचा आहे त्याचे नांव लिफाप्यावर लिहून** अधिक्षक जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा न्यायालय, चंद्रपूर यांच्याकडे **दिनांक ०१/०७/२०२३ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत** अथवा त्यापूर्वी पोहोचतील अशा अंदाजाने आपले अर्ज पाठवावेत.

दिनांक ०१/०७/२०२३ रोजीनंतर प्राप्त झालेले अर्ज अथवा इतर मार्गाने पाठविलेले किंवा लिफाप्यावर पदाचे नाव नमुद न केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

पात्र उमेदवारांची यादी जिल्हा न्यायालयाचे संकेतस्थळwww.districts.ecourts.gov.in/chandrapur प्रसिध्द करण्यात येईल.

..२..

Scanned with OKEN Scanner

## सर्व पदाकरीता वयोमर्यादा

अ) उमेदवार, सर्वसाधारण प्रवर्गाकरीता १८ वर्षापेक्षा कमी वयाचा आणि ३८ वर्षापेक्षा जास्त वयाचा नसावा आणि अनुसूचित जाती, अनुसुचित जमाती, इतर मागासवर्ग किंवा महाराष्ट्र शासनाद्वारे २८/०३/२०१८ रोजी त्यावेळेपुरत्या विनिर्दिष्ट केलेल्या मागासप्रवर्गाकरीता ४३ वर्षापेक्षा जास्त वयाचा नसावा.

ब) शासन निर्णय क्र.एस.आर.व्ही–१०७७/३५७६/१८३३/१६:अ, दिनांक २३/०५/१९७८ नुसार शारीरीकदृष्ट्या दिव्यांग व्यक्ती, जर त्या अन्यथा योग्य व सदर पदांची कर्तव्य पार पाडण्याकरीता सक्षम असतील तर, त्यांच्या बाबतीत सेवा प्रवेशासाठी विहित केलेली उच्च वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत शिथिल केलेली आहे.

क) सदर पदे ही <u>**निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असून फक्त एक वर्ष कालावधीसाठी कंत्राटी**</u> स्वरुपात भरण्यात येणार आहेत. उमेदवाराचा या पदावर नोकरीत कायम करणे बाबत कोणत्याही प्रकारचा हक्क राहणार नाही.

ड) उमेदवाराच्या सेवा त्याच्या / तिच्या कामगिरीचे मुल्यमापन केल्यानंतर कोणतीही सुचना आणि स्पष्टीकरण न देता कोणत्याही वेळी संपुष्टात आणल्या जाऊ शकतात.

इ) उमेदवारास नेमणूकीच्या कालावधीपूर्वी नोकरी सोडावयाची असल्यास एक महिन्याची आगावू सूचना किंवा एक महिन्याचा ढोबळ / स्थूल पगार या प्राधिकरणास जमा करावा लागेल.

## <u>उमेदवारांना सुचना</u>

१. उमेदवाराने नमुन्यातच अर्ज व सोबतची प्रमाणपत्रे तसेच शैक्षणिक प्रमाणपत्राच्या प्रति सादर कराव्यात.

२. उमेदवाराने त्याचे / तिचे अलीकडचे पासपोर्ट आकाराचे रंगीत छायाचित्र फोटो अर्जावर दिलेल्या जागी लावून त्यावर अशाप्रकारे स्वाक्षरी करावी की त्यातील काही भाग छायाचित्रावर आणि अर्जावर सुध्दा येईल.

३. उमेदवाराने एका सन्माननीय व्यक्तीची जाहीरातीच्या तारखेनंतर दिलेले चारित्र्याचा दाखला सादर करावा, तसेच त्यांचे विरुध्द कुठल्याही न्यायालयात कुठलाही फौजदारी खटला निकाली / चालु किंवा प्रस्तावित नसल्याचे प्रमाणित करावे. असल्यास त्याचा तपशिल द्यावा.

४. विहीत नमुन्यात नसलेला आणि अपूर्ण माहिती असलेला अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.

५. सदर जाहीरातील आवश्यक ते बदल करण्याचे अधिकार निवड समितीकडे राखून ठेवलेले आहेत.

६. Office Assistant & Receptionist-Cum-data Entry-operator या पदासाठी आवश्यक ती संगणकावरील टंकलेखन चाचणी परीक्षा घेण्यात येईल. तसेच उमेदवाराची तोंडी २० गुणांची मुलाखत घेण्यात येईल.

अ) मराठी भाषेतील २० गुणांच्या टंकलेखन परीक्षेत उमेदवाराला संगणकावर १० मिनिटात ३०० शब्द टंकलिखीत करावे लागतील. (३० श.प्र.मि.) उमेदवाराने केलेल्या टंकलेखनाचे मुल्यमापन जिल्हा न्यायालयातील लघुलेखकांच्या मदतीने करुन घेतले जाईल.



Scanned with OKEN Scanner

ब) ज्या उमेदवारांना मराठी भाषेतील टंकलेखन चाचणीमध्ये सेवाप्रवेश समितीने ठरविल्याप्रमाणे कट ऑफ गुण मिळतील असे उमेदवार, इंग्रजी टंकलेखन चाचणी देण्यास पात्र ठरवील.

क) इंग्रजी भाषेतील २० गुणांच्या टंकलेखन परीक्षेत उमेदवाराला संगणकावर १० मिनिटात ४०० शब्द टंकलिखीत करावे लागतील. (४० श.प्र.मि.) उमेदवाराने केलेल्या टंकलेखनाचे मुल्यमापन जिल्हा न्यायालयातील लघुलेखकांच्या मदतीने करुन घेतले जाईल.

ड) मराठी व इंग्रजी भाषेतील टंकलेखन चाचणी परीक्षेच्या उत्तरपत्रिकाचे मुल्यमापन करतांना ५ चुकांसाठी १ गुण कापण्यात येईल. तसेच मजुर वगळणे ही देखील चुक धरली जाईल.

७. ज्या उमेदवारांना इंग्रजी टंकलेखनात सेवाप्रवेश समितीने निश्चित केल्याप्रमाणे कअ ऑफ गुण मिळतील त्यांना इंग्रजी टंकलेखन परीक्षेनंतर होणा—या मौखिक परीक्षेसाठी पात्र समजले जाईल. जाहिरात दिलेल्या पदसंख्येपेक्षा तिप्पट उमेदवारांना, त्यांना इंग्रजी टंकलेखन आणि मराठी टंकलेखन परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारावर मौखिक परीक्षेसाठी बोलाविले जाईल. तर १:३ हे प्रमाणे राखण्यासाठी शॉर्ट लिस्ट केलेल्या उमेदवारांपैकी शेवटच्या उमेदवाराइतके गुण मिळवणारे एकापेक्षा अधिक उमेदवार असतील, तर अशा सर्व उमेदवारांना मौखिक परीक्षेसाठी बोलाविले जाईल.

८. वयाच्या पडताळणीसाठी जन्म प्रमाणपत्र अथवा शाळा सोडल्याचा दाखला किंवा शालांत परीक्षेचा दाखला आवश्यक राहील.

९. समितीने असे ठरविले आहे की, निवड करण्यासाठी निम्नतम पात्रता गुण निश्चित करण्यात आले नसतील तेथे असे निम्नतम पात्रता गुण ३५ टक्के असावेत.

१०. उमेदवारांना चाचणी परीक्षांसाठी निश्चित केलेल्या तारखांना स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

११. सेवाप्रवेश प्रक्रियेच्या वेळापत्रकात या कार्यालयाचे नियंत्रण नसलेल्या कोणत्याही अकल्पित घटनांच्या घडण्यासापेक्षा बदल होवू शकतो. असा बदल वेळोवेळी कार्यालयाच्या सुचनाफलकावर अधिसुचित करण्यात येईल आणि जिल्हा न्यायालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

20/06/2023

(सुमित वि. जोशी)
सचिव,
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,
जिल्हा न्यायालय, चंद्रपूर.

चंद्रपूर
दिनांक २०/०६/२०२३

Scanned with OKEN Scanner

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,
जिल्हा न्यायालय, चंद्रपूर.

लोक अभिरक्षक, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, चंद्रपूर चे कार्यालयाकरीता निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात एक वर्षाकरीता पदाचा अर्जाचा नमुना

नुकतेच काढलेले
फोटो

१. अर्ज करण्यात येणा—या पदाचे नांव : ______________________

२. अर्जदाराचे पुर्ण नांव व पुर्ण पत्ता : ______________________

______________________

______________________

३. आधार कार्ड क्रमांक : ______________________

४. मोबाईल क्रमांक व ईमेल आयडी : ______________________

५. जन्म दिनांक : ______________________

६. उमेदवाराचे जाहिरातीच्या दिवशीचे वय : ______________________

७. शैक्षणिक अर्हता

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | विद्यापीठ | उत्तीर्ण वर्ष | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |
| ६ | | | | |
| ७ | | | | |
| | | | | |

८. सोबत कागदपत्राच्या स्वयंसाक्षांकीत प्रती जोडणे आवश्यक आहे.

अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी

Scanned with OKEN Scanner